**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 10.09.2025** **वार- बुधवार**

---

**<u>पाणी</u>**

पुणे शहराची लोकसंख्या 81 लाख 64 हजार गृहीत धरून पुणे महापालिकेने 21 पूर्णांक 3 शतांश टीएमसी पाण्याची मागणी केली होती. पण प्रत्यक्षात पाटबंधारे विभागानं पुणे महापालिकेसाठी 2025-26 या वर्षाकरिता 14 पूर्णांक 61 टीएमसी पाणी मंजूर केलं आहे. त्यात खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातून 11 पूर्णांक 50 टीएमसी, पवना धरणातून 34 शतांश टीएमसी तर भामा-आसखेड जलाशयातून 2 पूर्णांक 67 टीएमसी पाणीसाठा देण्यात आला आहे. त्यामुळं पुणेकरांना वर्षभर पाणी पुरवण्यासाठी महापालिकेला अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

**<u>सांडपाणी</u>**

पुणे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या 23 गावांपैकी 16 गावांमध्ये सांडपाणी वाहिन्यांचं जाळे निर्माण करण्यासाठी राज्य सरकारनं महापालिकेच्या 324 कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. केंद्र

सरकारकडून अमृत 2 या अभियानाच्या अंतर्गत आणि राज्य सरकारकडून प्रत्येकी 25 टक्के म्हणजेच 80 कोटी 94 लाख रुपयांचा निधी मिळणार आहे. तर उर्वरित 50 टक्के खर्च पुणे महापालिका करणार आहे.

**मातृवंदना**

महिला आणि बालकल्याण विभागाकडून प्रधानमंत्री मातृवंदना योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. सध्या अंगणवाडी केंद्रांमार्फत प्राथमिक नोंदणी आणि नवीन लाभार्थ्यांच्या नोंदणीचं काम युद्धपातळीवर सुरू आहे. पुणे शहरासह जिल्ह्यात आतापर्यंत एक हजार 646 गर्भवतींची नोंदणी करण्यात आल्याची माहिती पुणे जिल्हा परिषदेच्या महिला आणि बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद खंडागळे यांनी दिली. ‘मातृवंदना’ लाभार्थी गर्भवतींना पाच हजार आणि सहा हजार रुपये दोन टप्प्यांत दिले जातात. जुन्या शिल्लक असलेल्या लाभार्थ्यांची कागदपत्रं मागवून त्यांनाही परवानगी दिली जात असल्याचं खंडागळे यांनी सांगितलं.

**लिडर्स**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाजविकास विभागाद्वारे 'सक्षमा' प्रकल्पांतर्गत फेडरेशन लिडर्ससाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. उडान, आरंभ आणि झेप या तीन फेडरेशनमधील 26 महिला लिडर्स, तसंच क्षेत्रिय समाजसेवक आणि क्षेत्रित समन्वयक सहभागी झाले. अंतरंगातून नेतृत्व, अंतर्मनाचा आवाज स्वीकारणं, इतरांचे

नेतृत्व करणं, भविष्य घडविणं, लैंगिक समतोल, अर्थसंकल्प तसंच लैंगिक समानता प्रशिक्षण आदी विषयांचा प्रशिक्षणात समावेश होता. सर्व महिला लिडर्सनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## <u>निरीक्षक</u>

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागातील नवनियुक्त आरोग्य निरीक्षकांसाठी दहा दिवसांच्या पायाभूत प्रशिक्षण कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे. आरोग्य प्रशासन, जन्ममृत्यू अधिनियम, महापालिका अधिनियम 1949 अंतर्गत अधिकार, महापालिकेची रचना आणि विभागांचं कार्य, राष्ट्रीय लसीकरण आणि पोषण कार्यक्रम, माहितीचा अधिकार, महाराष्ट्र नागरिक सेवा, आरोग्य आजार आणि प्रथमोपचार, घनकचरा व्यवस्थापन नियम 2016 आणि टिप्पणी लेखन आणि पत्रलेखन याविषयी या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

## <u>शिष्यवृत्ती</u>

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील समन्वय वाढला, तर शिष्यवृत्ती योजनेतील अडचणी दूर होतील. सारथी, स्वयंम स्वाधार, महाज्योती, महाडीबीटी या माध्यमातून मिळणाऱ्या शिष्यवृत्त्या लवकर मिळतील, असं मत समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विलास लोंढे यांनी व्यक्त केलं. नॅशनल फार्मसी वेल्फेअर असोसिएशनतर्फे शिष्यवृत्ती सहाय्य कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. विद्यार्थी कोणत्याही प्रवर्गातील असला, तरी प्रवेश घेताना सर्व कागदपत्रांची शिक्षकांनी पडताळणी करावी.

'समावेश'सारखी संस्था फार्मा संघटनेच्या विविध महाविद्यालयांमध्ये स्वतः जाऊन साहाय्य करत असल्याची माहिती लोंढे यांनी दिली.

**<u>संमेलन</u>**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीनं सतरावं छत्रपती संभाजी महाराज मराठी साहित्य संमेलन रविवारी 5 ऑक्टोबरला पुण्यातील महात्मा फुले सांस्कृतिक भवनात होणार असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर शरद गोरे यांनी दिली. छत्रपती संभाजी महाराज यांच्यावरील साहित्य आणि इतिहासाचा प्रसार होण्याच्या उद्देशानं या साहित्य संमेलनाचं आयोजन केलं जातं.

**<u>दिव्यांग</u>**

दिव्यांगांची बोगस प्रमाणपत्र घेऊन बदलीचा लाभ घेणाऱ्या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची प्रमाणपत्रं तपासणीचा दुसरा टप्पा सुरु करण्यात आला आहे. ससून रुग्णालयानं दिलेल्या दिव्यांग प्रमाणपत्राची तपासणी ससूनमध्येच करण्यात येईल. तर, अन्य लोकांची शासकीय वैद्यकीय रुग्णालयात करण्यात येणार असल्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली. जिल्हा परिषदेनं, जिल्हा परिषद आणि जिल्हा नियोजन समितीच्या निधीतील कंत्राटी कामांसाठी एकत्रित पद्धतीनं निविदा काढण्याच्या प्रक्रियेवर पूर्णपणे बंदी घातली असल्याचंही पाटील यांनी सांगितलं.

**<u>यशस्वी</u>**

युवा पिढीने सिक्युरिटी मार्केट क्षेत्रातील कौशल्ये संपादित करून या क्षेत्रातील करिअरच्या संधींकडे सकारात्मकतेने पाहावं असं मत नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटीज मार्केट्सचे सहाय्यक महाव्यवस्थापक शुभायु दास यांनी व्यक्त केलं. चिंचवड येथील यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सच्या वतीने आयोजित परिसंवादात ते बोलत होते. सिक्युरिटीज मार्केटचे महत्त्व आणि आर्थिक जागरूकता याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

**<u>फूले</u>**

गणेश उत्सवानंतर पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फूल बाजारात मंदीचं वातावरण आहे. पितृ-पंधरवड्यामुळं फुलांना फारशी मागणी नाही. पुणे बाजारात सातारा जिल्हा आणि सोलापूर जिल्ह्यातून शोभिवंत फुलांची आवक होत आहे. मात्र मागणी अभावी फुलांचे दर निम्म्यानं खाली घसरले आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**